**क्रमांक:** २२५३/एनओटी-३६१८/सीआर-२२(स्था)(मु)/२०१९/१८ **दिनांक:** ४ डिसेंबर, २०१९

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक** 24 **नोव्हेंबर**, 2019 रोजी घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१९** या स्पर्धा परीक्षेच्या **स्थापत्य अभियांत्रिकी** पेपर क्रमांक-1 व **स्थापत्य अभियांत्रिकी** पेपर क्रमांक-2 या प्रश्नपुस्तिकांच्या चारही संचाची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

**प्रस्तुत परीक्षेसाठी उमेदवारांना प्रश्नपुस्तिकांच्या उत्तरतालिकेतील प्रश्न-उत्तरासंबंधी हरकती/अभिवेदने करावयाची असल्यास, ती आयोगाने प्रसिध्द केलेल्या हरकतीच्या नमुन्यातच करावयाची आहेत. आयोगाच्या वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर "हरकतीचा नमुना" उपलब्ध आहे. आयोगाने विहित केलेल्या हरकतीच्या नमुन्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील हरकती स्वीकारल्या जाणार नाहीत.** उमेदवारांनी त्यांच्या हरकती परीक्षा नियंत्रक व सहसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, $5^{1/2}$, 7 व 8 वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई 400021 या पत्त्यावर पाठवावे. या संदर्भात **दि.** 11 **डिसेंबर**, 2019 पर्यंत आयोगाकडे पोहोचलेल्या निवेदनांचीच फक्त दखल घेतली जाईल. तद्नंतर आलेल्या हरकती/अभिवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : 4 डिसेंबर, 2019
ठिकाण : मुंबई

परीक्षा नियंत्रक व सह सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
मुंबई